REGISTERED No. B. 3434




# अर्थ

वर्ष १५ पुणें, बुधवार तारीख ७ सप्टेंबर, १९४९ अंक ३६

दी
## बँक ऑफ कोल्हापूर, लि.

एच. एच. दी छत्रपति महाराजा ऑफ कोल्हापूर यांचे सरकारचे आश्रयाखालील व त्यांचा फार मोठा पाठिंबा मिळत असलेली.

*[ कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली. ]*

**स्थापनाः १९२६.**

मुख्य कचेरी :
सर वर्डवुड रोड, लक्ष्मीपुरी, कोल्हापूर.

तार : **BANKOP** फोन : २८९

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | ४०,०६,५०० रु. |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | २०,२६,००० रु. |
| वसूल | १०,१३,००० रु. |
| रिझर्व्ह फंड | ७,८६,००० रु. |
| खेळतें भांडवल | २,८८,००,००० रु. हून अधिक |

शाखा :
(१) गुजरी (२) शाहुपुरी–कोल्हापूर (३) मलकापूर (४) पेठ वडगांव (५) जयसिंगपूर (६) इचलकरंजी (७) गडहिंग्लज (८) निपाणी (जि. बेळगांव) (९) मुंबई–फोर्ट– -- ) मुंबई–मांडवी.

—बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात—
मुख्य कचेरींत सेफ डिपॉझिट लॉकर्सची उत्तम व्यवस्था.

व्ही. ए. सावंत, जनरल मॅनेजर.

## दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर ( बेलापूर रोड ), ओझर ( जि. नाशिक )

पे-ऑफिसः—खोपोली ( जि. कुलाबा )

श्री. बी. बी. वाळवेकर ( अध्यक्ष ) ||| श्री. के. पी. जोशी ( उपाध्यक्ष )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ३,९८,२८५ |

**एकूण खेळतें भांडवल ५३ लाखांचे वर**

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. वा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
} *मॅनेजिंग डायरेक्टर.*

## दि मोटार ओनर्स म्युच्युअल इन्शुअरन्स कं. लि. (बेळगांव)

पुणें शाखाः–९७४ सदाशिव, लक्ष्मी रोड.

मोटार मालकांनींच स्थापन केलेली, मोटारींचा विमा उतरणारी, मोटार मालकांचेंच संचालक मंडळ असलेली व विमेदारांना हक्कानें शेअर्स देण्याची योजना आखणारी अखिल भारतांतील पहिलीच संस्था. प्रीमियमचे दर अत्यंत माफक व शिवाय अनेक सवलती. –एजन्सी व इतर माहितीकरितां चौकशी करा.–

ब्रँच सेक्रेटरी

## दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७१, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** बुधवार चौक, पुणें

## सोसायट्यांस विनंति

किर्लोस्कर कंपनी सोसायट्यांना ज्या भावांत माल देते त्याच भावांत आम्हीहि नांगर वगैरे माल पुरवितों. आपली कोणतीहि ऑर्डर आपण आमचे मार्फत पाठविण्यानें तोटा नसून फायदाच आहे. सर्व तऱ्हेची सोसायट्यांना लागणारी माहिती व इतरहि माल आम्ही पुरवितों.

**या वर्षीची ऑर्डर आमचे मार्फतच पाठवा.**

केळकर बंधु, पुणें व नाशिक.


## विविध माहिती

**रेल्वेच्या उत्पादनांत घट**—हिंदुस्थानांतील रेल्वेंतून सध्या प्रचलित असलेल्या तीन वर्गांच्या डब्यांची पद्धत सुरू होऊन जवळ जवळ ८ महिने झाले. ह्या आठ महिन्यांच्या अनुभवावरून, उतारूंची अधिक सोय करण्यासाठी आणि रेल्वेच्या उत्पन्नांतील घट थांबविण्यासाठी ह्या पद्धतींत फरक करण्याची आवश्यकता भासूं लागली आहे. १९४९ च्या पहिल्या तिमाहींत वरिष्ठ वर्गांच्या प्रवाशांपासून होणारें उत्पन्न बरेंच खालीं आलें आहे. १९४८ सालच्या पहिल्या तिमाहींत पहिल्या, दुसऱ्या आणि इंटरच्या डब्यांतून प्रवास करणाऱ्यांपासून जितकें उत्पन्न झालें, त्याच्यापेक्षा नवीन पद्धतीच्या पहिल्या व दुसऱ्या वर्गांच्या प्रवाशांपासून १९४९ च्या पहिल्या तिमाहींत २०·४५ लाख रुपये कमी उत्पन्न झालें. उत्पन्नांतील ही तूट भरून काढण्यासाठीं एक नवा सेकंड क्लासचा डबा जोडण्याचें घाटत आहे. सध्याच्या सेकंड क्लासच्या प्रवाशांना जास्तींत जास्त मैलीं ९ पै भाडें द्यावें लागतें; त्याऐवजीं नवीन 'सेकंड क्लास' मधून प्रवास करण्यासाठीं मैली १४ पै ह्या दरानें द्यावें लागेल. वाढलेल्या दरानें भाडें देण्याबद्दल ह्या प्रवाशांना झोंपण्याची जागा देण्यांत येईल आणि कोठल्याही स्टेशनवरून जागा राखून ठेवतां येईल. सध्याच्या सेकंड क्लासच्या प्रवाशांना जादा आकार देऊन झोंपण्याची जागा मिळण्याची जी व्यवस्था आहे ती रद्द करण्यांत येणार आहे, असें समजतें.

**ग्वाल्हेरचे महाराज कंपनी डायरेक्टर झाले**—गेल्या जून मध्यें सीलोनमध्ये रजिस्टर करण्यांत आलेल्या दोन बड्या कंपन्यांत ग्वाल्हेरच्या महाराजांनीं आणि राणी साहेबांनीं भांडवल गुंतविलें असून, ते दोघेही ह्या कंपन्यांचे डायरेक्टर बोर्डांत दाखल झाले आहेत असें समजतें.

**परदेशी रेशमाची आयात**—इटली आणि जपान ह्या देशांतून १ लाख पौंड कच्चें रेशीम आयात करण्याची परवानगी हिंदुस्थान सरकारनें म्हैसूर सरकारला दिली आहे. संस्थानामधील रेशमाचीं वस्त्रें विणणाऱ्या हातमाग कामगारांना कच्च्या रेशमाची उणीव भासत असल्यामुळें ही आयात करण्यांत येत आहे. रेशीम आयात झाल्यावर हा धंदा चालू ठेवण्याला बरीच मदत होईल अशी अपेक्षा करण्यांत येत आहे.

**हिंद सरकार काटकसर करणार**—सध्यां हिंदुस्थानांत जी आर्थिक अवलक्षणें दिसत आहेत तीं लक्षांत घेऊन हिंद सरकारनें आपल्या चालू आणि भांडवली खर्चांत तावडतोब कपात करण्याचें ठरविलें आहे असें समजतें. सरकारनें आपल्या सर्व खात्यांना असें कळविलें आहे कीं, प्रत्येक खात्यानें आपल्या भांडवली खर्चांत २० टक्के कपात करावी; प्रवासाचे भत्ते आणि इतर नैमित्तिक खर्च ह्यांत १० टक्के कपात करावी आणि पगार व महागाई भत्ते ह्यांत ५ टक्के कपात करावी.

**विक्री-कर कोणी घ्यावा ?**—विक्रीकर कोणत्याही स्वरूपांत मध्यवर्ती सरकारनें वसूल करण्यास प्रांतिक सरकारांचा विरोध आहे असें समजतें. सध्या ह्या प्रश्नासंबंधीं वाटाघाटी चालू असून विक्रीकर हा प्रांतांना आणि मध्यवर्ती सरकारांना दोघांनाही जे कर बसवितां येतील त्या घटनात्मक यादींत घालण्यास प्रांतिक सरकारें फार तर तयार होतील असें दिसतें. विक्रीकर हा कमी-अधिक करतां येण्यासारखा लवचीक असल्यानें नवीन राज्यघटनेंतील मध्यवर्ती सरकारच्या खास अखत्यारांतील कर-विषयांच्या यादींत तो समाविष्ट करण्यास प्रांतिक सरकारें संमति देतील असें वाटत नाहीं.

**जागतिक बँकेकडून हिंदुस्थानला कर्ज**—बिहारमध्यें एक वीज-केंद्र उभारण्यासाठीं २,२०,००,००० डॉलर्स आणि शेत जमिनींतील तण मुळापासून उपटून काढण्याच्या यंत्रांसाठी १,५०,००,००० डॉलर्स अशी आणखीं दोन कर्जें जागतिक बँकेकडून मिळविण्याविषयीं वाटाघाटी चालू आहेत. ह्या शिवाय आणखीही कर्जें हिंदला मिळण्याची शक्यता आहे. हिंदुस्थानला मिळूं शकणारें डॉलर्सचें कर्ज बऱ्याच गोष्टींवर अवलंबून आहे. किती व्याज आणि मुद्दलाची फेड करणें हिंदुस्थानला शक्य होईल, ह्यासंबंधीं बँकेचें जें मत होईल त्यावर मुख्यत: आणखी कर्जाची रकम अवलंबून राहील.

**फौंटनपेनच्या शाईच्या धंद्याला संरक्षण**—फौंटनपेनची शाई तयार करण्याच्या धंद्याला संरक्षण देण्याचा प्रश्न हिंद सरकारच्या व्यापारी खात्यानें टॅरीफ बोर्डाकडे चौकशीसाठी सोपविला आहे.

**धान्याच्या किंमती कमी केल्या पाहिजेत**—हिंदुस्थान सरकारचे अन्नविषयक कमिशनर श्री. आर. के. पाटील ह्यांनीं नुकतेच असे उद्गार काढले कीं, अन्नधान्याच्या किंमती खालीं आणल्याशिवाय रहाणीच्या खर्चाचा निर्देशांक खालीं उतरणार नाहीं.

**मेसर्स डब्ल्यु. अँड टी. अॅव्हरी लि.**—ह्या ब्रिटिश कंपनीचा व्यवहार हिंदुस्थानांत व पाकिस्तानांत कित्येक शाखांचे द्वारां चालू आहे. हिंदुस्थान व पाकिस्तान येथें स्वतंत्र कंपन्या स्थापून त्यांचेकडे हा व्यवहार सोपविण्याचें त्या फर्मनें आतां ठरविलें आहे.

**पोस्ट ऑफिस इन्शुरन्स फंड रूल्स**—हिंद सरकारनें पोस्ट ऑफिस इन्शुरन्स फंड रूल्समध्यें दुरुस्ती करून नियमान्वयें देण्यांत आलेल्या विमापत्रकांवर कर्ज देण्याची सोय केली आहे. ही सवलत १ सप्टेंबर १९४९ पासून दोन वर्षेपर्यंत प्रयोग म्हणून चालू ठेवण्यांत येणार आहे. फंडाच्या नियमान्वये देण्यांत आलेल्या विमापत्रकाच्या तारणावर, विमापत्रकाच्या सोड किंमतीच्या ९० टक्के कर्ज ह्यापुढें विमेदाराला मिळूं शकेल. कर्जें देणें आणि त्याची वसुली करणें, ह्याबाबतचे नियमही तयार करण्यांत आले आहेत.


## खातेदारासाठी खास सवलत

एका वेळीं रु. २५०० पर्यंत मुंबईवरचे ड्राफ्टस बँकेचे खातेदारास कमिशन न घेतां दिले जातात.

**बँक ऑफ पूना लि.**

४५५ रविवार, पुणें २.

# अर्थ

बुधवार, ता. ७ सप्टेंबर, १९४९



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र


## रिझर्व्ह बँकेचा वार्षिक आढावा

रिझर्व्ह बँकेचा १९४८–४९ चा आर्थिक आढावा नुकताच प्रसिद्ध झाला आहे, त्यास सद्यःस्थितींत विशेष महत्त्व आहे. हिंदुस्थानांतील चढीच्या किंमती, असमाधानकारक उत्पादन, सरकारी खर्चाचें वाढतें प्रमाण, औद्योगिक क्षेत्रांतील अविश्वासाचें वातावरण, परदेशी गंगाजळीस लागलेली ओहोटी, इत्यादींचें रहस्य समजण्यास प्रस्तुत आढाव्याचा व त्यांतील तपशीलवार माहितीचा चांगला उपयोग होण्याजोगा आहे. हिंदुस्थानाच्या आर्थिक प्रगतीच्या मार्गांतील अडथळे व ते दूर करण्याचे प्रयत्न, ह्यांचें स्वरूप स्पष्ट होण्यास त्याचें सहाय्य होईल; कारण रिझर्व्ह बँकेचा आढावा हें हिंदी राष्ट्राच्या आर्थिक व औद्योगिक परिस्थितीचें उत्कृष्ट प्रतिबिंब असून त्याची डोळसपणें छाननी करणें बोधप्रद होईल.

प्रस्तुत रिपोर्टाची पृष्ठसंख्या २३९ असून त्यांतील पहिली ६० पृष्ठें परदेशांतील आर्थिक घडामोडींच्या वर्णनानें व्यापली आहेत. त्यानंतरच्या १०५ पृष्ठांच्या दुसऱ्या भागांत प्रास्ताविक, उत्पादन व किंमती, परराष्ट्रीय व्यापार, येण्या–देण्यांतील तफावत व हुंडणावळीचें नियंत्रण, सोनें, चांदी, सरकारी बजेटें, राष्ट्रीय कर्ज, भांडवल, पैसे व बँकिंग, चलन, इत्यादि विषयांचा परामर्श घेण्यांत आला आहे. विस्तृत माहितीचे तक्ते नंतर जोडलेले आहेत. अशा रीतीनें हा आढावा तपशीलानें परिपूर्ण आहे. रिझर्व्ह बँकेच्या वेगवेगळ्या खात्यांनीं हिंदी आर्थिक परिस्थितीसंबंधीं माहिती एकत्रित करून तिचें उपयुक्त संकलन करण्याचें कार्य चालविलें आहे, त्याची छाप रिपोर्टावर पडली आहे. त्यांतील आकडे मांडण्याची पद्धत आतां फारच सुधारली आहे.

### गुंतवणूक कमी होत चालली

रिझर्व्ह बँकेच्या वार्षिक आढाव्यांतील कांहीं बाबींचा उल्लेख येथें करणें योग्य होईल. अहवालाचे मुदतींत शेअर्सचे भाव आणखी खालीं घसरले. १९२७–२८ मध्यें सामान्यपणें ते १०० होते असें मानलें तर १९४६ च्या ऑगस्टमध्यें ते ३१४·९ पर्यंत वाढून १९४७ च्या मार्चमध्यें २३५·६ वर आले, १९४८ च्या मार्चमध्यें १७८·० वर उतरले आणि १९४९ च्या मार्चमध्यें १५२·० इतके खालीं आले. हैद्राबादचा प्रश्न यशस्वी रीतीनें सुटला, काश्मीरमध्यें युद्ध तहकूब झालें, १९४९–५० च्या बजेटांत कित्येक करांच्या सवलती मिळाल्या आणि उद्योगधंद्यांतील खासगी प्रयत्नांचें स्थान स्पष्ट करण्यांत आलें, तरीसुद्धा शेअर्सचे भाव उतरत गेले, ह्याचा अर्थ गुंतविण्याजोगा पैसा अपुरा पडला हाच होतो. पूर्वीच्या नफ्याइतक्या नफ्याची अपेक्षा नसल्यामुळें कांहीं पैसेवाले रक्कम गुंतविण्यास तयार नव्हते हें खरें असलें, तरी समाजाच्या कांहीं वर्गांतील बचतीची शक्तीच कमी झाली आणि ज्यांना पैसे गुंतविण्याची किंवा बँकिंगची संवय नाहीं अशांची मिळकत वाढली हेंहि खरें आहे. जुलै १९४८ ते मार्च १९४९ ह्या मुदतींत शेड्यूल्ड बँकांकडील ठेवींत ९५ कोटी रुपयांची घट झाली. तसेंच, प्रसृत चलनी नोटांची संख्याहि ८ कोटी रुपयांनीं उतरली. १९३८–३९ नंतर असें आकुंचन कधीं झालेंच नव्हतें. वर्षाच्या शेवटच्या तिमाहींत पैशाच्या बाजारांत विशेषच तंगी आली. शेड्यूल्ड बँकांनीं दिलेल्या कर्जाची रक्कम १८ मार्च रोजीं ४९८ कोटी रुपये इतकी मोठी झाली. पांच प्रमुख क्लिअरिंग हौसेसमधील चेक्सची उलाढाल ४४८ कोटी रुपयांनीं वाढली. रिझर्व्ह बँकेची पोंडी शिल्लक मोठ्या रकमेनें उतरली.

### भांडवल उभारणीसाठी परवानग्या

कंपन्यांच्या भांडवल उभारणीवरील नियंत्रण अहवालाचे वर्षी चालूच होतें. वर्षाचे अवधींत फक्त ३४८ कंपन्यांना ११२ कोटी रुपयांच्या भांडवल उभारणीस परवानगी देण्यांत आली. १९४७–४८ मध्यें ४२६ कंपन्यांना १६२ कोटी रुपयांची परवानगी देण्यांत आली होती. औद्योगिक भांडवल उभारणीच्या परवान्यांचाच एकूण परवानग्यांत मोठा हिस्सा होता. कंपन्यांच्या एवढ्या भांडवल उभारणीस परवानगी दिली, परंतु त्यापैकीं प्रत्यक्ष किती भांडवल खपलें किंवा वसूल झालें ह्याची माहिति मात्र उपलब्ध नाहीं. खालील तक्त्यांत भांडवल उभारणीच्या परवानग्यांबाबत तपशील दिला आहे.

#### कंपन्यांची वर्गवारी

| वर्गीकरण | कंपन्यांची संख्या | मंजूर केलेल्या योजना (कोटी रुपये) |
|---|---|---|
| औद्योगिक | २१७ | ६१·३२ |
| शेतकी | १० | ३·६३ |
| आर्थिक | ७४ | १८·९२ |
| वहातुक व व्यापार | ३८ | २१·९३ |
| इतर | ९ | ६·१३ |
| एकूण बिगर औद्योगिक | १३१ | ५०·६१ |
| १९४८–४९ (औद्योगिक व बिगर–औद्योगिक) | ३०१ | १११·९३ |
| १७ मे, १९४३ ते ३१ मार्च १९४९ अखेरची एकूण बेरीज | ५,०२० | ९१५·४४ |

### दुष्प्राप्य डॉलर मिळवणारा चिमुकला कुमार

डॉलर मिळविण्यासाठीं इंग्लंडचा कसून प्रयत्न चालू आहे, त्यास एलिझाबेथ—मौंटबॅटनचा पुत्र चार्लस हा आपल्या परीनें हातभार लावीत आहे. जॉर्ज राजाच्या ह्या नातवाकडे इंग्रजांचेंच केवळ नव्हे, तर अमेरिकनांचेंहि कुतूहलपूर्ण लक्ष आहे. त्याच्या ब्लँकिटासारखें ब्लँकीटच आपल्या मुलांना देण्याची इंग्रज–अमेरिकन स्त्रियांची इच्छा आहे. चार्लसच्या खेळण्यासारखींच खेळणीं स्वतःच्या मुलांना द्यावींशीं त्यांना वाटतात. सहाजिकच, अशा मालास इंग्लंडप्रमाणें अमेरिकेंतहि मोठी मागणी येत आहे. चार्लसच्या आवडीचें, तें सर्वांच्या आवडीचें होऊं लागलें आहे. इंग्रज कारखानदारांच्या व्यापारवृद्धीस चार्लसनें चांगली चालना दिली आहे.

## कंपनी कायद्यांत दुरुस्ती

[ ३ ]

### ( ६ ) कंपनीच्या हिशेबाचीं पत्रकें

भागीदार हे कंपनीचे मालक असतात, परंतु त्यांचा कंपनीच्या कारभाराशीं प्रत्यक्ष संबंध येत नाहीं व त्यांना दैनंदिन गोष्टींची माहिती असूं शकत नाहीं. फक्त एकदा वार्षिक सभेंत त्यांना कंपनीचा कारभाराचा आढावा घेण्याची संधी मिळते. सहाजीकच भागीदारांच्या दृष्टीनें ताळेबंद व नफा–तोटा पत्रक विशेषत: ताळेबंद, ह्यांस विशेष महत्त्व आहे. परंतु, पुष्कळ वेळां वस्तुस्थिति स्पष्ट करण्यापेक्षा झाकण्याच्या दृष्टीनेंच त्यांची मांडणी केलेली असते. घसाऱ्याची केलेली तरतूद पुरेशी आहे किंवा नाहीं, ह्याचा खुलासा आढळत नाहीं. त्याचप्रमाणे, कंपनीस किती कर भरावा लागणार आहे, हेंहि भागीदारांना कळत नाहीं. स्टॉक्सचें मूल्यमापन वस्तुस्थितीस धरून असलेंच असें नाहीं, ह्या सर्व बाबतींत बॉंबे स्टॉक एक्सचेंजनें तपशीलवार सुधारणा सुचविल्या आहेत.

### ( ७ ) ऑडिटर

व्यवस्थापकांनीं केलेल्या चुका भागीदारांच्या नजरेस आणणें हें ऑडिटरांचें काम. परंतु कित्येक वेळां हें काम नीट बजावलें जात नाहीं. मॅनेजिंग एजंट व डायरेक्टर बोर्ड ह्यांच्यावर ऑडिटरांची नेमणूक बहुंशीं अवलंबून असते, त्यामुळें असें होतें. कंपनीच्या हिशेबाच्या पुस्तकांवरून ऑडिटर तपासणी करून सही करतो, परंतु पुस्तकांतील नोंदी ह्या वस्तुस्थितिनिदर्शक नसणें शक्य असतें. भागीदारांना त्यांचा स्वत:चा ऑडिटर क्वचितच नेमतां येतो, कारण त्यांच्याजवळ पुरेसें मतबल नसतें. म्हणून ऑडिटरांचे मध्यें सक्तीनें बदल होण्याची तरतूद स्टॉक एक्सचेंजनें सुचविली आली आहे. "कंपनीच्या ऑडिटरच्या जोडीस सरकारनेंहि एका ऑडिटरची नेमणूक करावी. अर्थात, कंपनी लहान असेल किंवा सार्वजनिक महत्त्वाची नसेल, तर सरकारी नियुक्त ऑडिटरची आवश्यकता नाहीं. कोणताहि ऑडिटर ओळीनें तीन वर्षे त्याच कंपनीचा ऑडिटर राहूं नये." अशाहि प्रकारच्या सूचना करण्यांत आल्या आहेत आणि ऑडिटरांवर कायदेशीर जास्त जबाबदारी टाकण्यांत आली आहे.

### ( ८ ) डायरेक्टर—मॅ. एजंटांचीं बाहुलीं ?

कंपनीवर नियंत्रण ठेवण्याचे कार्मी डायरेक्टर हे भागीदारांचे प्रतिनिधी म्हणून काम करतात. परंतु पहिल्या डायरेक्टरांची योजना त्यांनीं स्वत:ची स्वत:च केलेली असते आणि पुढें प्रॉक्झी पद्धतीनें ते आपल्या कामावर कायम टिकून राहूं शकतात. मॅनेजिंग एजंटांच्या पुढ्यांतील लोकांनाच त्यामुळें डायरेक्टर होतां व रहातां येतें. कित्येक प्रसंगीं डायरेक्टर हीं मॅनेजिंग एजंटांचीं बाहुलीं बनून त्यांना व्यवस्थेवर प्रभावी नियंत्रण ठेवणें अशक्य होतें. ही परिस्थिती सुधारणें फार अवघड असलें तरी त्या दिशेनें स्टॉक एक्सचेंजनें दोन सूचना केल्या आहेत:–( अ ) डायरेक्टरांची निवड क्युम्युलेटिव्ह मतदान पद्धतीनें व्हावी व (ब) रोटेशननें निवृत्त होणारे डायरेक्टर हे मॅनेजिंग एजंटांचे नातलग, भागीदार किंवा संबंधी असूं नयेत.

### ( ९ ) चेअरमन

एकादी विशिष्ट व्यक्ती आमरण चेअरमन राहील, किंवा कांहीं विशिष्ट वर्षे चेअरमन राहील, किंवा मॅनेजिंग एजंटानें नियुक्त केलेलाच मनुष्य चेअरमन होऊं शकेल असें बंधन कांहीं कंपन्यांच्या आर्टिकल्समध्यें आढळतें. नियंत्रण आणि देखरेख ह्या दृष्टीनें चेअरमनची जागा इतर डायरेक्टरांपेक्षा अधिक महत्त्वाची असते. ह्यासाठीं तो स्वतंत्र विचाराचा आणि भागीदारांच्या विश्वासाचा असणें अगत्याचें आहे. परंतु वर सांगितलेल्या तरतुदी भागीदारांच्या हितास बाधक आहेत. चेअरमन हा मॅनेजिंग एजंटांनीं नियुक्त केलेला डायरेक्टर असूं नये, किंवा तो त्यांचा नातलग, भागीदार अथवा हितसंबंधीं असूं नये; त्याचप्रमाणें फेरनिवडणूक ज्यास आवश्यक आहे असा डायरेक्टरच चेअरमन होऊं शकावा, अशी बॉंबे स्टॉक एक्सचेंजची सूचना आहे.

### (१०) मॅनेजिंग एजंटस: नोकर, मालक नव्हेत

बोर्ड ऑफ डायरेक्टर्सनीं घालून दिलेल्या धोरणाची अंमलबजावणी करणें व दैनंदिन कारभार पहाणें हें मॅनेजिंग एजंटांचें वस्तुत: काम. परंतु, कंपनी व मॅनेजिंग एजंटस ह्यांचेमधील करारांनीं एजंटस कंपनीस बांधून घेऊन ते तिचे मालकच बनतात. हें टाळण्यासाठी बॉंबे स्टॉक एक्सचेंजची सूचना अशी आहे:–कंपनी व तिचे डायरेक्टर्स हे मालक असून मॅनेजिंग एजंट हे नोकर आहेत. हें नातें एजन्सीच्या करारानें स्पष्ट करावें. उदाहरणार्थ, बोर्डाच्या मंजुरीशिवाय मॅनेजिंग एजंटांना कॉल्स करतां येऊं नयेत, नवें भांडवल विक्रीस काढतां येऊं नये किंवा भांडवली स्वरूपाचा खर्च करतां येऊं नये; खरेदी–विक्रीचे करार पैशाची गुंतवणूक, कर्ज उभारणें, कर्ज देणें, आपल्या हाताखालच्या लोकांना स्वत:चे अधिकार देणें, इत्यादि गोष्टींसहि बंदी असावी, ह्या मूलभूत तत्त्वाचे विरूद्ध असलेले करार बेकायदा समजले जावे.

### (११) मॅ. एजंटांच्या कराराची मुदत

मॅनेजिंग एजंटांनीं आपली नेमणूक स्वत:च केलेली असते; मॅमोरँडम–आर्टिकल्समध्यें त्यांच्या नेमणुकीची तरतूद करण्यांत आलेली असते. त्याकारणानें भागीदारांना त्यांत कांहींच हात नसतो. कंपनी कायद्याप्रमाणें मॅ. एजन्सीच्या कराराची कमाल मुदत २० वर्षे सांगितलेली आहे, त्या कमाल मुदतीचा फायदा बहुतेक सर्व मॅ. एजंट घेतात. कंपनीला मिळालेले लायसेन्स, भाडेपट्ट्याचे करार, इत्यादींची मुदत त्यापेक्षा अल्प मुदतीची असली तरी मॅ. एजन्सीची मुदत मात्र २० वर्षांखाली नसते. २० वर्षांनंतरहि त्यांना कंपनीनें काढीपर्यंत तेच एजंट रहावे अशी तरतूद असते. आणि त्यांना काढणें कठीण व्हावें अशाच अटी करारांत अंतर्भूत केलेल्या असतात. बॉंबे स्टॉक एक्सचेंजनें सुचविलें आहे कीं, मॅनेजिंग एजन्सीच्या कराराची मुदत १० वर्षांपेक्षा दीर्घ असूं नये आणि करार संपताक्षणींच त्यांची जागा आपोआप खाली व्हावी; कंपनीनें स्पेशल ठराव करून वाटलें तर त्यांची फेरनेमणूक करावी.

### (१२) मॅ. एजंटांचें वेतन

कंपनी स्थापन करते वेळींच मॅनेजिंग एजन्सीचें वेतन ठरविलेलें असतें. मॅनेजिंग एजंट हेच कंपनीचे प्रवर्तक असल्याकारणानें, त्यांना वेतन काय मिळावें, हें त्यांनींच निश्चित केलेलें असतें. कित्येक करारांतील वेतनाच्या अटी भरमसाट असतात. निव्वळ नफ्यावर १५% ते २०% कमिशन आकारण्यांत येतें आणि तें करतांना घसारा, कराची तरतूद इत्यादि बाबी वगळून निवळ नफा हिशेबांत घेतला जातो. त्यामुळें, भागीदारांचा हिस्सा फारच कमी होतो. त्याबरोबरच मोठा ऑफिस अलावन्सहि असतो, परंतु सर्व नोकरांचा पगार मात्र कंपनी देत असते. अशा रीतीनें, मॅनेजिंग एजंटांना त्यांच्या सेवेच्या मानानें भरमसाट मिळकत होते. भागीदारांवरील अन्याय दूर करण्याच्या दृष्टीनें बॉंबे स्टॉक एक्सचेंजनें खालीलप्रमाणें सूचना केल्या आहेत:–( अ ) मॅनेजिंग एजंटांना निवळ नफ्याच्या ७½% पेक्षा ज्यास्त कमिशन मिळूं नये, ( ब ) निवळ नफ्याचा हिशेब करतांना घसारा, कर, इत्यादींचा आकार त्यांतून वगळण्यांत यावा, आणि ( क ) ऑफिस अलावन्स अजिबात देण्यांत येऊं नये.

## इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया

### कोणत्या कंपन्यांना किती कर्ज मंजूर झालें?

| कारखाना | मंजूर रक्कम ( रु. ) |
|---|---|
| टेक्स्टाइल माशिनरी | ४३,००,००० |
| ऑइल इंजनें | १०,००,००० |
| रसायनें | ५६,५०,००० |
| सिरॅमिक्स व काच | ४०,००,००० |
| इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग | २६,००,००० |
| ऑइल मिल्स | १,७५,००० |
| वीज शक्ती | ३,००,००० |
| मेटॅलर्जिकल इंडस्ट्री (नॉनफेरस) | ३०,००,००० |
| लोखंड—पोलाद ( फौंड्री ) | १५,५०,००० |
| कपास टेक्स्टाइल्स | ४०,००,००० |
| लोकर टेक्स्टाइल्स | ५,००,००० |
| इतर | ११,५०,००० |
| एकूण | २,४२,२५,००० |

### कर्जाची प्रांतवार वाटणी

| प्रांत | कर्जांची संख्या | रक्कम ( रु. ) |
|---|---|---|
| पश्चिम बंगाल | ३ | ७५,५०,००० |
| मद्रास | ३ | ७५,००,००० |
| मुंबई | ६ | ७३,००,००० |
| बिहार | ३ | ५५,५०,००० |
| ओरिसा | १ | ३०,००,००० |
| पूर्व पंजाब | २ | १५,००,००० |
| संयुक्त प्रांत | ३ | ८,२५,००० |

कॉर्पोरेशननें मंजूर केलेल्या कर्जांची रक्कम ३ कोटी,४२¼ लक्ष रुपये असली तरी प्रत्यक्ष आदा झालेली रक्कम १¾ कोटींचे वर नाहीं. ह्याचें कारण, कर्ज घेणाऱ्या कंपन्या एकदम सबंध रक्कम न उचलता जरूरीप्रमाणें, हप्त्याहप्त्यानें त्या उचलतात.

कित्येक प्रांतिक सरकारांचा प्रांतिक इं. फि. कॉर्पोरेशन्स स्थापन करण्याचा विचार आहे. मद्रासनें ह्या बाबतींत आघाडी मारली आहे. सध्याच्या बाजाराच्या परिस्थितींत प्रांतिक सरकारांना भांडवल मिळविणें कठीण जाईल. मध्यवर्ती व प्रांतिक कॉर्पोरेशन्सनीं व्यवहारक्षेत्र वाटून घ्यावें; प्रांतिक कॉर्पोरेशन्सनीं लहान, मध्यम व खेडेगांवीं धंद्यांच्या गरजेकडे लक्ष द्यावें, अशी इं. फि. कॉर्पोरेशन ऑफ इंडियाच्या डायरेक्टरांची सूचना आहे

### पुणें जिल्हा खरेदी–विक्री संघाची नवी घटना

ह्या खरेदी–विक्री संघाची विशेष साधारण सभा नुकतीच भरली होती, तिनें संघाच्या संचालक मंडळाच्या घटनेंत दुरुस्ती केली आहे. संघाचें पहिलें संचालक मंडळ सर्वस्वी सरकार-नियुक्त होतें, त्याची तीन वर्षांची मुदत आतां संपत आहे. संचालक मंडळांत एकूण १८ लोक असावे, त्यांपैकीं ६ शेतकी सोसायट्यांचे, ३ बिगर शेतकी सोसायट्यांचे व ६ व्यक्तिशः भागदारांचे प्रतिनिधी असावे आणि रजिस्ट्रार, सेंट्रल बँक व कलेक्टर ह्यांनीं नियुक्त केलेला प्रत्येकी १ प्रमाणें ३ सभासद असावे, असें ठरलें.

### प्रांतिक सहकारी कौन्सिलची बैठक

मुंबई प्रांतिक सहकारी कौन्सिलची दुसरी बैठक पुणें येथें को. ट्रेनिंग कॉलेजांत ता. १८ सप्टेंबर रोजीं भरणार आहे.

कंपनीचे अध्यक्ष म्हणाले:—

### वृत्तपत्रांचा दैनिक खप

"युद्धापूर्वी दररोज १ कोटी, ९० लक्ष वृत्तपत्रें खपत असत. आतां त्यांची संख्या २ कोटी, ९० लक्षांवर गेली आहे. लोकसंख्या ५ कोटी धरली, तर प्रत्येक १¾ माणसांमागे एक वृत्तपत्र खपतें, असा हिशेब होतो. अमेरिकेंत दैनिकांचा खप ५ कोटींचा आहे; म्हणजे तेथें ३ माणसांमागे एक वृत्तपत्र खपतें. दुसऱ्या टोकाला हिंदुस्थान व पाकिस्तान ह्यांतील ४० कोटी लोक मिळून दररोज २० लक्ष वृत्तपत्रें वाचतात. म्हणजे, २०० लोकांना एक वृत्तपत्र असा तेथें हिशेब होतो. आपल्या येथील ( ब्रिटन ) वृत्तपत्रांच्या प्रतींची संख्या वाढली असली, तरी त्यांचा आकार व पृष्ठसंख्या घटली आहे. त्यामुळें, १९३२ सालीं त्यांना जेवढा कागद लागत असे, तेवढाहि आतां लागत नाहीं. अमेरिकेंतील वृत्तपत्रांचा आकार व त्यांची पृष्ठसंख्या फारच मोठी असल्यानें, तेथील कागदाचा खप कितीतरी ज्यास्त आहे. खालील तक्त्यांत युद्धापूर्वीचा व १९४८ सालाचा कांहीं प्रमुख देशांतील कागदाचा खप दिला आहे.:—

दर हजार लोकसंख्येसाठी उपयोगांत येणारा न्यूजप्रिंट

| | युद्धापूर्वी | टन कागद |
|---|---|---|
| ब्रिटन | २९·५ | ८·९ |
| अमेरिका | २७·४ | ३८·८ |
| कॅनडा | १७·३ | २३·३ |
| फ्रान्स | ९·६ | ६·७ |
| डेन्मार्क | १५·९ | ११·३ |
| रशिया | १·२ | १·६ |
| हिंदुस्थान | ०·१ | ०·२" |

लॉरेन्स जे. कॅडबरी
दि डेली न्यूज, लि. ( ब्रिटन )

कंपनीचे अध्यक्ष म्हणाले:—

### टाटा डिफर्डचा अंत नजीक आला

"टाटा आयर्न अँड स्टील कंपनीनें आपल्या डिफर्ड शेअर्सचें ऑर्डिनरी शेअर्समध्यें रूपांतर करावें, अशी टारीफ बोर्डाची शिफारस आहे. १९४० सालापासूनच मॅनेजिंग एजंट अशा रूपांतराच्यासाठीं प्रमुख भागीदारांशीं खटपट करीत आहेत. परंतु कांहीं अल्पसंख्य डिफर्ड भागीदार बहुसंख्याकांच्या व अखेर स्वतःच्याहि हिताचे आड येत आहेत. ही गोष्ट आपआपसांत सलोख्यानें मिटली नाहीं, तर सरकार मध्यें पडून रूपांतर सक्तीनें घडवून आणील, आणि डिफर्ड शेअर्सबद्दल सरकारची फारशी सहानुभूति नसल्यानें सरकारी योजना डिफर्डवाल्यांचा मनाजोगी होईलच, असें नाहीं. डिफर्ड भागीदारांनीं हें लक्षांत घेऊन सहकार्यासाठी पुढें यावें; नाहींतर टारिफ बोर्डाची शिफारस अमलांत आणणें आम्हांस शक्य होत नाहीं, असें आम्हीं सरकारास कळवूं आणि मग सरकार त्यास योग्य वाटेल तें करील."

सर जे. आर. डी. टाटा
टाटा आयर्न अँड स्टील कंपनी लि.

### श्री. शंतनुराव किर्लोस्कर

किर्लोस्कर ऑइल इंजिन्स लि. चे श्री. शंतनुराव किर्लोस्कर ह्यांचेवर गॉल ब्लॅडर स्टोनसाठीं नुकतीच शस्त्रक्रिया करण्यांत आली. इस्पितळांतून ते आतां घरीं परत आले असून त्यांची प्रकृति सुधारत आहे.

## विसर्जनाभिमुख कंपन्यांच्या थकलेल्या भाग-हप्त्यांची वसुली

### मुंबई हायकोर्टाचा महत्त्वाचा ताजा निवाडा

विसर्जनाभिमुख ( इन लिक्विडेशन ) कंपनीच्या भागदारांवरील जबाबदारीचें स्वरूप विशद करून दाखविणारा महत्त्वाचा निवाडा नुकताच मुंबई हायकोर्टानें दिला आहे.

असोसिएटेड बँकिंग कार्पोरेशन लि. ह्या विसर्जनाभिमुख कंपनीच्या विसर्जनाधिकाऱ्यांनीं ( लिक्विडेटर ह्यांनीं ) महंमद अकबर अबदुल्ला फाजलभाई ह्यांजविरुद्ध दावा लावून सुमारे ११ हजार रुपयांची मागणी केली होती. ही रक्कम फाजलभाई ह्यांनीं कंपनीचे जे भाग ( शेअर्स ) घेतले होते त्यांच्या न दिलेल्या हप्त्यांची होती. ह्या हप्त्यांची मागणी सप्टेंबर १९४५ मध्यें पुरी करावयाची होती. विसर्जनाधिकाऱ्यांची नेमणूक १८ एप्रिल, १९४७ रोजीं झाली होती व रकमेची मागणी फाजलभाईकडे त्यांनीं ९ जुलै १९४८ च्या पत्रानें केली होती. ती मागणी पुरी झाली नाहीं तेव्हां मग दावा लावण्यांत आला होता. मूळचा दावा फक्त थकलेल्या हप्त्यांची मागणी करणारा होता. अशा दाव्यास मुदतीच्या कायद्यांत मागणी रक्कम देण्याच्या तारखेपासून तीन वर्षांची मुदत सांगितलेली आहे. त्यामुळें ह्या दाव्यास मुदतीची हरकत येईल ही गोष्ट लक्षांत येऊन कंपनीतर्फे नंतर सदर दाव्यांत दुरुस्ती करण्यांत येऊन सदर फाजलभाई ह्यांजकडून वरील रकमेची मागणी भरपाईदार 'कॉन्ट्रीब्युटरी' ह्या नात्यानें करण्यांत येत असल्याचें नमूद करण्यांत आलें. सदरील दावा मुंबई हायकोर्टाचे न्यायमूर्ति श्री. तेंडोलकर यांच्यापुढें नुकताच पुराव्याला निघाला होता. त्यावेळीं फाजलभाई ह्यांजतर्फे पहिला मुद्दा असा मांडण्यांत आला कीं, विसर्जनाधिकाऱ्यांनीं हप्त्याची मागणी केल्याशिवाय भरपाईदार कंपनीस कांहीं देणें लागत नाहींत व प्रचलित कंपनी कायद्यांत तर विसर्जित कंपनीसाठी हप्ते मागण्याचा अधिकार विसर्जनाधिकाऱ्यास कोठेंच दिलेला नाहीं. परंतु कोर्टानें हें म्हणणें मान्य केलें नाहीं. विसर्जनाधिकारी हे हप्ता मागत नसून भरपाईसाठी भागभांडवलापैकी उर्वरित रक्कम मागत असतात. ती देण्याची जबाबदारी भाग खरेदीच्या करारावरून (एक्स् कॉन्ट्रॅक्चु) नव्हे, तर कंपनी कायद्याच्या ठरावावरून (एक्स् लेजीस्) भागदार-भरपाईदारांवर असते, असें स्पष्ट मत कोर्टानें नमूद केलें आहे. दुसरा मुद्दा मुदतीचा उपस्थित करण्यांत आला होता. त्याबाबत भरपाईदाराकडून रक्कम वसूल करण्यास थकलेल्या हप्त्याची रक्कम देणें झाली तेव्हांपासून नव्हे, तर कंपनी विसर्जन करण्याचा हुकूम कोर्टानें केल्यापासून तीन वर्षांची मुदत आहे असा कोर्टानें निर्णय दिला; आणि म्हणून कंपनीस फाजलभाई विरुद्ध पूर्ण रकमेचा हुकुमनामा कोर्टाकडून मिळाला.

स. वा. दातार

---

**इसबगोलच्या बियांची निर्यात**— इसबगोल ह्या औषधी बियांची ५० लाख रुपये किंमतीची निर्यात हिंदुस्थान दरवर्षी करतो. ह्या बिया घेणाऱ्यांत अमेरिकेचा नंबर पहिला लागतो. बियांचा उपयोग हगवण, बद्धकोष्ठ इत्यादि आंतड्यांच्या रोगांवर फार चांगला होतो. हिंदुस्थान हा एकटाच देश ह्या बिया निर्यात करतो. २० वर्षांपूर्वी बियांची निर्यात जवळ जवळ नव्हतीच म्हटलें तरी चालेल. आज मात्र हिंदच्या निर्यातींत त्यांना महत्त्वाचें स्थान प्राप्त झालें आहे.

## पर-प्रांतांतील बातम्या

**राजस्थानांत ताडीपासून गूळ**—राजस्थान सरकारनें ताडीपासून गूळ करण्याच्या योजनेसाठी ७४,००० रुपये मंजूर केले आहेत. राजस्थान संघराज्यांत ह्या धंद्याचा प्रारंभ करण्यासाठी १५ विद्यार्थ्यांना दक्षिण हिंदुस्थानांत पाठविण्यांत येणार आहे.

**इंदूरमध्यें एंजिनिअरिंग कॉलेज**—इंदूरमध्यें एक एंजिनिअरिंग कॉलेज काढण्यासाठी गोविंदराम सेकसारिया ट्रस्टतर्फे २००,००० रुपयांची देणगी देऊं करण्यांत आली आहे. ह्याशिवाय तांत्रिक शिक्षण देणारी एक शाळा काढण्यासाठीहि एका धनिकानें २,००,००० रुपयांची देणगी कबूल केली आहे. दोन्ही संस्थांची तपशीलवार आंखणी करण्यासाठी मध्यभारत सरकारनें एक समिति नेमली आहे.

**पश्चिम बंगालमधील महारोगी**—प. बंगालमध्यें सुमारें २,००,००० महारोगी आहेत. त्यापैकीं ६०,००० फक्त बंकुरा जिल्ह्यांतच आहेत, अशी माहिती अधिकृतरीत्या जाहीर झाली आहे.

**पाकिस्तानांत गेलेल्या मुसलमानांची मालमत्ता**—हिंदमधून पाकिस्तानांत गेलेल्या मुसलमानांची मालमत्ता ताब्यांत घेणारा वटहुकूम गेल्या मे महिन्यांत काढण्यांत आला. तेव्हांपासून मुंबईमधील १० कोट रुपयांची मालमत्ता हिंद सरकारनें आपल्या ताब्यांत घेतली आहे. ह्या मालमत्तेंत इमारती, उद्यानें, हॉटेल्स, इत्यादि प्रकारची जिंदगी आहे.

**सोमनाथाच्या देवळांतील मूर्तींचा उद्धार**—सोरटी सोमनाथ ह्या काठेवाडांतील इतिहासप्रसिद्ध देवळांतील मूर्तींचा भंग १,००० वर्षांपूर्वी गझनीच्या महमुदानें केला होता. ज्या ठिकाणीं ही मूर्ति होती त्या ठिकाणीं शिवलिंगाची स्थापना करण्याचें आतां ठरलें आहे. ह्या देवळाचे दरवाजे महंमदानें लुटून नेले होते. ते नंतर आग्रा येथील किल्ल्यांत परत आणण्यांत आले होते असें म्हणतात. तसें असेल तर देवळाचा जीर्णोद्धार करतांना हे प्राचीन दरवाजे पुन्हा वापरण्यांत येण्याचा संभव आहे.

**रेशमी कापडाचा धंदा संकटांत**—बनारसमधील रेशमाचें कापड विणण्याच्या धंद्यावर मंदीची छाया पसरल्यानें ह्या धंद्यांतील १२,००० विणकरांवर कठीण प्रसंग ओढवला आहे. ह्या सर्व हिंदु मुसलमान विणकरांनीं एके दिवशीं सकाळीं गंगेच्या काठावर जमून मंदीची वावटळ जाण्यासाठीं परमेश्वराची करुणा भाकली. सध्याची मंदी १९१४, १९३२ अगर १९४४ सालीं आलेल्या मंदीपेक्षांही अधिक तीव्र स्वरूपाची आहे.

**पश्चिम बंगालमधील रस्ते**— पश्चिम बंगालमध्यें रस्त्यांचें जाळें फारसें पसरलेलें नाहीं, असे उद्गार प. बंगाल सरकारचे मंत्री श्री. गुप्ता ह्यांनीं नुकतेच काढले. फाळणीनंतर १३,२५० मैल लांबीचे रस्ते तयार करण्याची योजना आंखण्यांत आली आहे. शिवाय २,७०० मैल लांबीचे रस्ते सुधारण्याचा पंचवार्षिक कार्यक्रमही आंखण्यांत आला आहे.

**हातमागाच्या कापडाची निर्यात**—हैद्राबाद संस्थानांतून हातमागाच्या कापडाच्या निर्यातीला ह्यापुढें परवाना लागणार नाहीं असें समजतें. ह्यापूर्वी हैद्राबादच्या टेक्स्टाइल खात्याचा परवाना घेतल्याशिवाय हातमागाच्या कापडाची निर्यात करता येत नसे. कापड विणणाऱ्या कामगारांना सवलत देण्याच्या हेतूनें परवान्याची पद्धत बंद करण्यांत आली आहे.

## साखरेचे सर्व साठे सरकार ताब्यांत घेणार

### किंमती उतरविण्याची योजना

डिसेंबर, १९४८ मध्यें साखरेची किंमत ३५ रु. ७ आ. मणावरून २८ रु. ८ आ. मणावर उतरविण्यांत आली होती. दर शेरास १२ ते १३ आणे दरानें १९४९ ह्या वर्षी हिंदुस्थानभर किरकोळ विक्रीची किंमत कायम ठेवण्याचें आश्वासन इंडियन शुगर सिंडिकेटनें दिलें होतें. जुलै महिन्यांत एकाएकी साखरेची किंमत चढून ऑगस्टमध्यें किरकोळ विक्रीची किंमत १ रु. २ आ. पर्यंत गेली. कारखानदार ठरलेल्या किंमतीपेक्षा ज्यास्त धाऊक दर घेऊं लागले आणि व्यापाऱ्यांनीं सहाजीकच आपली विक्रीची किंमत वाढविली. साखरेचा पुरवठा पुरेसा असतांनाहि साखरेच्या किंमतींत ही वाढ झालेली आहे. नवी साखर तयार होईपर्यंतच्या काळांत साखरेचा तुटवडा पडण्याचा संभव व्यापाऱ्यांना वाटत आहे.

इंडियन शुगर सिंडिकेटनें डिसेंबर १९४८ मध्यें ठरविलेली साखरेची किंमत (२८ रु. ८ आ. मण) प्रभावी करण्याचें हिंदुस्थान सरकारनें आतां ठरविलें आहे. कारखान्यांजवळील व बाहेरील विकला गेलेला किंवा न गेलेला साखरेचा सर्व साठा ह्या दरानें सरकार ताब्यांत घेणार आहे. हिंदुस्थान सरकारच्या वतीनें प्रांतिक सरकारें हें काम करतील आणि ठरविल्या जाणाऱ्या दरानें आणि मार्गानें त्याची वांटणी करतील. साखरेच्या येत्या मोसमासाठी साखरेची किंमत ठरवून दिली जाईल. शक्य तेवढा अधिक ऊंस गाळला जाऊन त्याची साखर केली जावी, ह्या दृष्टीनें प्रांतिक सरकारांना शक्यतो प्रयत्न करण्याची सूचना मध्यवर्ती सरकारनें केली आहे.

---

### दि महाड को. अर्बन बँक लि.

वरील बँकेनें ३०-६-४९ अखेर संपलेल्या वर्षी १½ कोटी रुपयांचा व्यवहार केला. तिचा ताळेबंद ९,०५,१८३ रुपयांचा असून तिचेकडे ७,६७,३५२ रुपयांच्या ठेवी आहेत. गेल्या वर्षाच्या बिकट काळांतहि ठेवींत ८० हजारांचेवर वाढ झालेली आहे. बँकेचें शेअर भांडवल ६४,००० रु. असून तिच्या रिझर्व्ह व इतर फंडांत ४९,२१३ रु. आहेत. म्हणजे, बँकेचें स्वतःचें १,१३,२१३ रुपयांचें भांडवल आहे. बँकेच्या शेअर्सना मागणी चांगली असून वाढविलेल्या शेअर भांडवलाची विक्री चालू आहे. बँकेनें १,३१,५५७ रु. रोख व बँकांत ठेवून ५,३६,३४४ रुपयांची रोख्यांत, कायम ठेवींत वगैरे इन्व्हेस्टमेंट केली आहे आणि १,३५,०२८ रुपयांचीं कर्जें दिलेलीं आहेत. ह्यावरून पैशांचा तरतेपणा स्पष्ट होईल. बँकेनें अहवालाचे वर्षी सुरू केलेला हुंडी व्यवहार समाधानकारक वाढत आहे. अहवालाचे सालीं मंजूर केलेल्या कॅश क्रेडिटच्या खातेदारांपैकी एकाहि खात्यांत थकबाकी राहिलेली नाहीं. मागील थकबाकीची वसुली चालू आहे. बँकेनें कापड वांटपाचे कामासाठी ५ ठिकाणीं केंद्रें उघडून लोकांची सोय केली. अहवालाचे वर्षी बँकेस १३,८३६ रु. निव्वळ नफा झाला. त्यांतून ५% डिव्हिडंड देण्यास ३,०५२ रु. लागतील. रिझर्व्ह फंडांत ३,४५९ रुपयांची व बिल्डिंग फंडांत ४,००० रुपयांची भर पडणार आहे. चालकांच्या काटकसरी धोरणामुळें बँकेची मजबुती अधिकाधिक वाढत आहे. बँकेची वार्षिक सभा ता. १८ सप्टेंबर रोजीं भरणार आहे. [अध्यक्ष: श्री. द. न. वैद्य, बी. ए., एलएल. बी.; ऑ. मॅ. डायरेक्टर: श्री. पि. गो. मेहता, बी. ए., एलएल. बी.; मॅनेजर: श्री. मा. गो. धारप, बी. एससी. (ऑनर्स)]

### चित्रपट धंद्याची चौकशी : पाटील कमिटी

हिंदुस्थानांतील चित्रपटाच्या धंद्याच्या प्रगतीचा आढावा घेऊन त्याच्या वाढीसंबंधीं सरकारास शिफारसी करण्याचें काम हिंदुस्थान सरकारनें एका कमिटीकडे सोपविलें आहे. श्री. स. का. पाटील हे त्या कमिटीचे अध्यक्ष असून सभासदांत श्री. व्ही. शांताराम ह्यांचें नांव आहे. २१ वर्षांपूर्वी रंगाचारी कमिटीनें चित्रपटाच्या धंद्याची चौकशी केली होती, तेव्हांचे मानानें हा धंदा आतां कितीतरी वाढलेला आहे. ह्या धंद्यांत १० कोटी रुपये भांडवल गुंतलेलें असून १८,००० लोकांचें पोट प्रत्यक्षपणें त्यावर अवलंबून आहे. निर्माण केलेल्या चित्रपटांचे संख्येचे बाबतींत हिंदुस्थानाचा अनुक्रम अमेरिकेच्या खालोखाल लागतो.

### विमा-परिभाषा

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या परिभाषा चर्चा मंडळानें विमाविषयक परिभाषा तयार केली आहे. ज्यांना या विमा परिभाषेची जरूर आहे, त्यांनीं "चिटणीस, म. सा. परिषद, टिळक रोड, पुणें २" या पत्त्यावर चार आण्याचीं तिकिटें पाठवावीं.

### सहकारी शिक्षण वर्ग

पूर्व खानदेश जिल्ह्यांतील शेतकी सहकारी सोसायट्यांच्या अन्ट्रेन्ड सेक्रेटरीसाठी पूर्व-खानदेश डिस्ट्रिक्ट को-ऑपरेटिव्ह बोर्डाचे वतीनें चाळीसगांव येथें सहकारी शिक्षण वर्ग शनिवार, ता. २० ऑगस्ट रोजीं सुरू झाला.

**सिलोनमध्यें साखरेचा कारखाना**—सीलोनच्या सरकारनें स्वतःच्या मालकीचा साखरेचा कारखाना काढण्याचें ठरविलें आहे. ह्या कारखान्यासंबंधीं सल्लामसलत देण्यासाठी हिंद सरकारनें कानपूर येथील शुगर टेक्नॉलजी ह्या संस्थेंतील एका तज्ज्ञ माणसाला सीलोनला पाठविण्याचें कबूल केलें आहे.

**साखरेच्या धंद्याचें संरक्षण**—साखरेच्या धंद्याला सध्यां दिलेल्या संरक्षक जकातीची मुदत ता. ३० मार्च १९५० अखेर संपत आहे. हिंद सरकारच्या व्यापारी खात्याच्या ठरावाप्रमाणें साखरेच्या धंद्याला दिलेल्या संरक्षणाबाबत टॅरीफ बोर्ड लवकरच तपशीलवार चौकशी करणार आहे असें समजतें.

---


## पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

### फक्त सभासदांकरितां.

# जाहीर नोटीस

या बँकेची वार्षिक साधारण सभा रविवार ता. २५ सप्टेंबर सन १९४९ रोजीं सायंकाळीं ५-३० वाजतां नूतन मराठी विद्यालयाचे असेंब्ली हॉलमध्यें भरून तींत सन १९४८-४९ सालचा अहवाल, ताळेबंद, नफावाटणी मंजूर करणें, स्थानिक हिशेब तपासनीसांच्या तपासणी यादीचा विचार करणें, नवीन पोटनियम नं. २४ (अ) मंजूर करणें, सन १९४९-५० सालासाठी डायरेक्टरांचें बोर्ड निवडणें, स्थानिक हिशेब तपासनीस नेमणें व त्यांचें वेतन ठरविणें, वगैरे नेहमींचीं कामें करण्यांत येतील. डायरेक्टरांच्या निवडणुकीबाबतचें व स्थानिक हिशेब तपासनीसांच्या नेमणुकीबाबतचें मतदान सदर दिवशीं त्याच इमारतींत सकाळीं ८-३० ते दुपारीं १२ पर्यंत होईल. तरी बँकेच्या सर्व सभासदांनीं सदर सभेस व मतें देण्यास अगत्य यावें अशी विनंती आहे.

पुणें शहर.
दि. २-९-४९

बोर्डाचे हुकुमावरून
द. वि. चितळे,
मॅनेजिंग डायरेक्टर

## परदेशांतील बातम्या

**तुर्कस्थानला जागतिक बँकेकडून कर्ज**— तुर्कस्थानच्या सरकारनें जागतिक बँकेकडे धान्याचीं गुदामें, पाटबंधारे, बंदरें, विद्युत्पादन केंद्रें इत्यादि बांधकामें करण्यासाठी कर्ज मागितलें आहे. ह्या संकल्पित कामांची तपासणी करण्यासाठी जागतिक बँकेनें पांच जणांचें एक मंडळ तुर्कस्थानला पाठविलें आहे. तुर्कस्थानच्या नैसर्गिक संपत्तीचा आढावा घेऊन तिचा विकास करण्यासाठी उपाय सुचविण्याचें कार्यही बँक करणार आहे.

**पाकिस्तान–ब्रिटन व्यापार**—ब्रिटनला पाकिस्तानकडून इतर देशांपेक्षां सर्वांत अधिक ताग आणि आखुड धाग्याचा कापूस निर्यात केला जातो. पाकिस्ताननें जुलै महिन्यांत ब्रिटनला ४,३९८ टन कच्चा ताग पुरवला. गेल्या वर्षीच्या ह्याच महिन्यांतील निर्यातीपेक्षां हा आंकडा चौपट आहे. ह्याशिवाय ब्रिटननें पाकिस्तानकडून ९३,२०,००० पौंड चहाही आयात केला. गेल्या सहा महिन्यांत पाकिस्ताननें ब्रिटनकडून आयात केलेल्या मालांत पोलादाची आयात वाढत्या प्रमाणावर आहे.

**ऑस्ट्रेलिआ जपानी पोलाद घेणार**—जपानमधील पोलादाच्या दोन कंपन्यांनीं एका ऑस्ट्रेलिअन कंपनीला ४,००० टन पोलादाचें बार देण्याचें कबूल केलें आहे. वरील दोन कंपन्यांपैकी एकीचें नांव जपान स्टील अँड आर्यन मॅन्युफॅक्चरिंग कंपनी असून ती सप्टेंबर अखेर ३,२०० टन बार धाडणार आहे. कोकुरा स्टील कंपनी नांवाची दुसरी कंपनी ७६२ टन पोलाद ऑक्टोबरअखेर रवाना करणार आहे.

**सुएझ कालव्याला जोड कालवा**—सुएझ कालव्यांतील बोटींची वहातूक अधिक सुलभ करण्यासाठी ७ मैल लांबीचा एक जोड कालवा खोदण्यांत येणार आहे. खोदकाम करण्याचें कार्य ५ फ्रेंच कंपन्यांनीं स्वीकारलें आहे. ह्या सुधारणेसाठी सुमारें १६२·५ कोटी फ्रँक्स खर्च येणार असून जोड कालवा तयार होण्यास १५ महिन्यांचा अवधि लागेल. नवा कालवा तयार झाल्यावर सध्या मुख्य कालव्यांत दोन बोटी विरुद्ध दिशेनें आल्या असतां एका बोटीला बाजूला थांबावें लागतें तसें थांबावें लागणार नाहीं. त्यामुळें वहातूक अधिक जलद होईल.

**आतां वेगळें अत्तर लावण्यास नको**—इंग्लंडमधील स्त्रियांना आतां सुवासिक कपडे मिळूं लागले आहेत. ग्लासगोमधील एका कंपनीनें एका प्रकारचें सुवासिक कापड तयार केलें असून त्याचा सुवास बराच महिने टिकतो आणि बऱ्याच वेळा धोब्याकडे कपडे देऊनही कमी होत नाहीं. हें कापड अमेरिकेंत निर्यात करून अधिक डॉलर्स मिळविण्याच्या हेतूनें तयार करण्यांत येत आहे. ७–८ प्रकारच्या सुवासाचे कपडे सध्या तयार करण्यांत येत आहेत. ह्या कापडाचे ब्लॉउझ ब्रिटनमधील बाजारांत मिळूं लागले आहेत.

**ब्रिटनची काटकसर**—अमेरिकेला ब्रिटनची आस्था पटवून देण्यासाठी, ब्रिटिश सरकारनें आपल्या खर्चांत वार्षिक १५ कोटी पौंडांची बचत करण्याचें जाहीर केलें आहे. वॉशिंग्टन येथें सुरू होणाऱ्या अमेरिकेबरोबरील वाटाघाटींची ही पूर्वतयारी आहे.

**अमेरिकन सरकारच्या लष्करी खात्यांत कपात**—अमेरिकन सरकारनें लष्करी खर्चांत कपात करण्याचें ठरविलें आहे. ह्या निर्णयास अनुसरून लष्करी स्वरूपाच्या कामांत गुंतलेल्या १,३५,००० मुलकी नोकरांना सेवानिवृत्त करण्यांत येणार आहे. ह्या कपातीच्या धोरणामुळें जून १९५० पासून अमेरिकेच्या लष्करी खर्चांत ५० कोटी डॉलर्सची बचत होणार आहे.


### कूळ व शेत-जमीन कायदा

१९४८

प्रसिद्ध झाला. साधी बांधणी किं. ४ रु.; उत्तम कागद व बांधणी ५ रु.; कूळकायदा (१९३९) तिसरी आवृत्ति किं. ३ रु.; दोन्ही कूळ कायदा सवलतीची किंमत साधी बांधणी ५ रु. व मजबूत बांधणी ६ रु.; मुंबई सावकारी कायदा किं. २॥ रु.; शेतकरी कर्जनिवारण कायदा किं. ४ व ४॥ रु.; घरभाडें नियंत्रण कायदा किं. २ रु.; द्विभार्याप्रतिबंधक कायदा दुसरी आवृत्ति, किं. १ रु.; हिंदु घटस्फोट कायदा किं. १ रु.

नवीन कूळ कायद्याप्रमाणेंच्या खंडाच्या पावत्या. २५ पावत्यांच्या पुस्तकास ८ आणे.

पत्ता— **लॉ ॲकॅडेमी**, ७२० सदाशिव, पुणें २.




### 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

## दि बॉम्बे प्रॉव्हिन्शिअल
## को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

मुख्य कचेरी:— ९ बेक हाऊस लेन, कोट, मुंबई
(मुंबई इलाख्याच्या १९२५ च्या ७ व्या कायद्यान्वये नोंदलेली)

स्थापन साल १९११

चेअरमनः-श्री. आर. जी. सरैय्या, ओ. बी. ई.

| | | |
|---|---|---|
| भागांचें भांडवल | रु. | २०,३९,२०० |
| गंगाजळी व इतर निधी | रु. | २७,२१,००० |
| ठेवी | रु. | ७,८९,७४,००० |
| खेळतें भांडवल | रु. | ८,९७,३७,००० |

प्रांतांतील दहा जिल्ह्यांमध्यें ५३ शाखा आहेत. हिंदी संघामधील महत्त्वाच्या शहरांमधून हुंड्या, बिलें वगैरे वसूल केलीं जातात. त्यांच्या शर्तींबद्दल मुख्य कचेरीकडे चौकशी करावी.

व्ही. पी. वर्दे
ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं ' दुर्गाधिवास ', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.